SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416004, MAHARASHTRA

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर–416004 महाराष्ट्र

वेबसाईट : ( www.unishivaji.ac.in)

Estd. 1962

NAAC 'A' Grade

संदर्भ क्र. शिवाजी वि./प.व मू.मं/324 दि. 01/10/2020

# परिपत्रक

**विषय :- मा.मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय,मुंबई यांचा शुभेच्छा संदेश.**

**संदर्भ:- मा.मंत्रीमहोदय यांचे दिनांक २८सप्टेंबर २०२० चे पत्र.**

मा.नामदार उदय सामंत, मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांनी महाविद्यालयीन व विद्यापीठ शिक्षक, तसेच सर्व विद्यार्थी, विद्यार्थीनी यांचेसाठी येऊ घातलेल्या परीक्षांसाठी तीन शुभेच्छा संदेश पाठविले असून, ते या परिपत्रकासोबत जोडले आहेत.

तरी सर्व संबंधिताना या परिपत्रकाद्वारे विनंती करण्यात येते की, मा.मंत्रीमहोदयांचे शुभेच्छा संदेश संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावेत. तसेच हे शुभेच्छा संदेश आपल्या महाविद्यालयाच्या संकेतस्थळावरही ठेवणेत यावेत.

( गजानन पळसे)
प्र.संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**संदर्भ क्र..: शिवाजी वि/प.व.मू.मं./324**
**दिनांक:– 01 ऑक्टोबर, 2020**

प्रत योग्य त्या कार्यवाहीसाठी :

१. मा.अधिविभागप्रमुख, विद्यापीठाचे सर्व शैक्षणिक अधिविभाग,

२. मा.प्राचार्य/मा.संचालक, विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये,

३. समन्वयक इंटरनेट सेल( विद्यापीठांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेसाठी )

सत्यमेव जयते

**मंत्री**
**उच्च व तंत्रशिक्षण**
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक : २८.०९.२०२०

**मंत्री उच्च व तंत्रशिक्षण, उदय सामंत यांच्या शुभेच्छा !**
**Minister Higher and Technical Education, Uday Samant's Greetings !**

**प्रिय शिक्षक बंधु आणि भगिनींनो,**

गेले जवळपास सात महिने आपण सगळे करोनाच्या संकटाचा सामना करत आहोत.आपल्या सगळ्यांचे दैनंदिन जीवन विस्कटल्यासारखे झाले आहे. महाविद्यालये आणि विद्यापीठांच्या विविध विभागांतले आपल्यासारखे संवेदनशील आणि अभ्यासू शिक्षक या काळात विद्यार्थ्यांचा अभ्यास,परीक्षा,त्यांची करियर्स याबद्दल निश्चितच चिंतित असतील.

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर शासन सर्व विद्यापीठांच्या मदतीने परीक्षांचे निर्दोष नियोजन करण्यासाठी कसोशीने प्रयत्न करत आहे. यासाठी मी राज्यातल्या सर्व विद्यापीठांना भेटी देऊन परिस्थितीचा आढावा घेतला आहे.विद्यापीठांचे कुलगुरू, कुलसचिव, परीक्षा नियंत्रक, महाविद्यालयांचे प्राचार्य यांच्या मदतीने सर्व विद्यार्थ्यांना विना अडथळा परीक्षा देता याव्यात यासाठी आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर ऑनलाईन आणि ऑफलाईन परीक्षांचा पर्याय वापरत आहेत. मात्र तंत्रज्ञानाची उपलब्धता नसल्याने एकही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची जबाबदारी आपल्या सगळ्यांची आहे.

आपण सगळे जण गेले काही महिने ऑनलाईन शिकवण्यात गुंतलेले आहात. माध्यम नवं असल्याने आव्हानंही नवी आहेत. पण या आपत्तीचं संधीत रूपांतर करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. येत्या काळात राज्यातल्या प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत गरजेप्रमाणे ऑनलाईन शिक्षण पोचवता यावं यासाठी आवश्यक त्या सर्व पायाभूत सुविधा युद्ध पातळीवर उपलब्ध करून दिल्या जातील. शिक्षणाच्या गुणवत्तेशी अजिबात तडजोड केली जाणार नाही. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी झटणारे आपण सगळे योद्धेच आहात असं मी मानतो.

आपल्याला परीक्षांच्या यशस्वी नियोजनासाठी मन:पूर्वक शुभेच्छा ! कोणत्याही टप्प्यावर अडचण आल्यास आपल्या विद्यापीठाशी आणि शासनाशी हक्काने संपर्क साधा.तणावमुक्त वातावरणात आपल्याला परीक्षा घेता याव्यात आणि करोनानंतरच्या काळातही शिक्षक म्हणून आपली कारकीर्द अशीच बहरावी या सदिच्छा !

**" माझे कुटुंब माझी जबाबदारी "**

**(उदय सामंत)**

मंत्री
उच्च व तंत्रशिक्षण
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक : २८.०९.२०२०

**मंत्री उच्च व तंत्रशिक्षण, उदय सामंत यांच्या शुभेच्छा !**

**Minister Higher and Technical Education, Uday Samant's Greetings !**

**माझ्या प्रिय विद्यार्थी / विद्यार्थिनींनो,**

गेले जवळपास ७ महिने आपण सगळे करोनाच्या संकटाचा सामना करत आहोत.आपल्या सगळ्यांचे दैनंदिन जीवन विस्कटल्यासारखे झाले आहे.अगदी तोंडावर आलेल्या परीक्षांपासून ते कधी आणि कशा होतील परीक्षा अशी प्रश्नचिन्हं घेऊन हा काळ आला आहे.

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर, मी मंत्री म्हणून राज्यातल्या सर्व विद्यापीठांना भेटी देऊन व सतत संवाद ठेवून आपल्या परीक्षा सुरळीत कशा पार पडतील याचा प्रयत्न करत आहे. विद्यापीठांना ऑनलाईन,ऑफलाईन अशा दुहेरी परीक्षांचा मार्ग स्वीकारावा लागला आहे. सर्व थरातल्या विद्यार्थ्यांना विनाअडथळा या परीक्षा देता याव्यात यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्याचे आदेश शासनाने विद्यापीठांना दिले आहेत आणि त्यावर शासनाचे सातत्याने लक्ष आहे.

प्रथम आणि द्वितीय वर्षाचे विद्यार्थी अंतिम वर्षी कोणता विषय घ्यायचा,करीयरचा कोणता मार्ग शोधायचा, दरम्यानच्या काळात कला, क्रीडा, सांस्कृतिक उपक्रम यात कसे सहभागी व्हायचे याचा विचार करत असतात. प्रत्यक्षातले महाविद्यालयीन जीवन काही काळ आपण अनुभवू शकत नसलात तरी या सक्तीच्या काळाचा आपण आपली आवड, करीयर यावर सखोल विचार करण्यासाठी वेळ वापरला पाहिजे. आपण सगळे लवकरच या संकटातून बाहेर पडू आणि विद्यार्थी म्हणून आपली आयुष्यं परिश्रमाने उजळून निघतील असा मला विश्वास आहे.

आपल्याला परीक्षेसाठी मन:पूर्वक शुभेच्छा ! कोणत्याही टप्प्यावर अडचण आल्यास आपल्या विद्यापीठाशी आणि शासनाशी हक्काने संपर्क साधा.तणावमुक्त वातावरणात आपल्याला परीक्षा देता यावी आणि आपल्या पुढील अभ्यासाचा मार्ग मोकळा व्हावा ही सदिच्छा !

**" माझे कुटुंब माझी जबाबदारी "**

**(उदय सामंत)**

मंत्री
उच्च व तंत्रशिक्षण
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २८.०९.२०२०

**मंत्री उच्च व तंत्रशिक्षण, उदय सामंत यांच्या शुभेच्छा !**

**Minister Higher and Technical Education, Uday Samant's Greetings !**

**माझ्या प्रिय विद्यार्थी / विद्यार्थिनींनो,**

गेले जवळपास ७ महिने आपण सगळे करोनाच्या संकटाचा सामना करत आहोत.आपल्या सगळ्यांचे दैनंदिन जीवन विस्कटल्यासारखे झाले आहे.अगदी तोंडावर आलेल्या परीक्षांपासून ते कधी आणि कशा होतील परीक्षा अशी प्रश्नचिन्हं घेऊन हा काळ आला आहे.

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर, मी मंत्री म्हणून म्हणून मी राज्यातल्या सर्व विद्यापीठांना भेटी देऊन व सतत संवाद ठेवून आपल्या परीक्षा सुरळीत कशा पार पडतील याचा प्रयत्न करत आहे. विद्यापीठांना ऑनलाईन, ऑफलाईन अशा दुहेरी परीक्षांचा मार्ग स्वीकारावा लागला आहे. सर्व थरातल्या विद्यार्थ्यांना विनाअडथळा या परीक्षा देता याव्यात यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्याचे आदेश शासनाने विद्यापीठांना दिले आहेत आणि त्यावर शासनाचे सातत्याने लक्ष आहे.

अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या करियरचे वेध लागलेले असतात. यंदा हा काळ सहा एक महिने पुढे गेला आहे. आपले महाविद्यालयीन, विद्यापीठीय जीवन आपण कला, क्रीडा, सांस्कृतिक उपक्रमात सहभागी होऊन नक्कीच समृध्द केले असेल. दूर आणि मुक्त शिक्षण संस्थांतून आपण शिकत असलात तर आपल्याला शिकणं आणि नोकरी अशा दुहेरी जबाबदाऱ्यांना सामोरं जावं लागलं असेल. आताच्या या सक्तीच्या काळाचा आपण आपली आवड,करीयर यावर सखोल विचार करण्यासाठी वापर केला असेल. आपण सगळे लवकरच या संकटातून बाहेर पडू आणि आपली आयुष्यं परिश्रमाने उजळून निघतील असा मला विश्वास आहे.

आपल्याला परीक्षेसाठी मन:पूर्वक शुभेच्छा ! कोणत्याही टप्प्यावर अडचण आल्यास आपल्या विद्यापीठाशी आणि शासनाशी हक्काने संपर्क साधा. तणावमुक्त वातावरणात आपल्याला परीक्षा देता यावी आणि आपल्या पुढील आयुष्याचा मार्ग मोकळा व्हावा ही सदिच्छा !

**" माझे कुटुंब माझी जबाबदारी "**

उदय सामंत

**(उदय सामंत)**